**संयुक्त प्रसिद्धी पत्रक : भारत-पॅराग्वे संयुक्त आयोग यंत्रणा (JCM) असुनसिओनची पहिली बैठक (14 नोव्हेंबर 2025)**

15 नोव्हेंबर 2025

भारत-पॅराग्वे संयुक्त आयोग यंत्रणेची (JCM) पहिली बैठक असुनसिओन शहरात आयोजित करण्यात आली. या बैठकीचे अध्यक्षस्थान पॅराग्वे सरकारतर्फे परराष्ट्र उपमंत्री, राजदूत व्हिक्टर व्हेर्डून यांनी भूषविले. तर भारत सरकारतर्फे परराष्ट्र मंत्रालयाचे सचिव (पूर्व) श्री. पेरियासामी कुमारन यांनी सह-अध्यक्ष म्हणून सहभाग नोंदवला.

2. याशिवाय, बैठकीला शिक्षण आणि विज्ञान मंत्रालय, सार्वजनिक आरोग्य आणि समाज कल्याण मंत्रालय, उद्योग आणि वाणिज्य मंत्रालय, माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान मंत्रालय, खाण आणि ऊर्जा उपमंत्रालय यासह संबंधित पॅराग्वे मंत्रालयांचे वरिष्ठ प्रतिनिधी उपस्थित होते.

3. ही बैठक सौहार्दपूर्ण आणि रचनात्मक वातावरणात पार पडली. ज्यामध्ये प्रतिनिधींनी द्विपक्षीय संबंधांच्या सध्याच्या स्थितीचा व्यापक आढावा घेतला. पॅराग्वेचे महामहिम राष्ट्रपती सँटियागो पेना पॅलासिओस यांच्या अलीकडच्या भारत प्रजासत्ताकाच्या दौऱ्यामुळे या संबंधांना मिळालेल्या नव्या गतिमानतेवर त्यांनी प्रकाश टाकला. ही भेट राजकीय संवाद मजबूत करण्यासाठी आणि समान हिताच्या विविध क्षेत्रांमध्ये द्विपक्षीय सहकार्य वाढवण्यासाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरली. पॅराग्वेच्या नॅशनल काँग्रेसमध्ये सिनेटर्स चेंबरमध्ये भारतासाठी संसदीय मैत्री आयोगाच्या स्थापनेचे भारताच्या वतीने स्वागत करण्यात आले.

4. बैठकीत, द्विपक्षीय अजेंडावरील मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. ज्यात राजकीय आणि आर्थिक संबंध, तंत्रज्ञानातील सहकार्य, पायाभूत सुविधा, ऊर्जा, शिक्षण, आरोग्य, व्यापार आणि गुंतवणूक, नागरी विमान वाहतूक, पर्यटन, अवकाश, शाश्वत विकास आणि जलसंपदा यांचा समावेश होता. याव्यतिरिक्त, आंतरराष्ट्रीय मंच आणि संस्थांमध्ये सहकार्यासह समान हिताच्या बहुपक्षीय मुद्यांवर विचारांची देवाणघेवाण करण्यात आली.

5. परस्पर फायदेशीर क्षेत्रात सहकार्य मजबूत करणे, व्यापाराला चालना देणे, गुंतवणुकीला प्रोत्साहन देणे आणि परस्पर हिताच्या क्षेत्रात बहुआयामी भागीदारी मजबूत करणे, तसेच द्विपक्षीय साधनांच्या वाटाघाटी पुढे नेणे या महत्त्वावर उभय बाजूंनी सहमती दर्शविली. खालील क्षेत्रांना प्राधान्य म्हणून ओळखले गेले: शेती; अक्षय ऊर्जा (विशेषतः सौर); जैवइंधन; माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान; सायबर सुरक्षा; सार्वजनिक आरोग्य; शिक्षण आणि तांत्रिक प्रशिक्षण; नागरी विमान वाहतूक; पायाभूत सुविधा, रेल्वे; पाणी व्यवस्थापन आणि सहकार्य; शाश्वत विकास; आणि अवकाश सहकार्य.

6. उच्चस्तरीय राजकीय संवाद अधिक दृढ करणे, अधिकृत भेटी आणि नियमित सल्लामसलत यांचे आदानप्रदान वाढवणे, प्राधान्य क्षेत्रांचा पाठपुरावा करणे, नवीन उपक्रमांचे मूल्यांकन करणे आणि विद्यमान साधनांची अंमलबजावणी सुलभ करणे या महत्त्वावर शिष्टमंडळांने सहमती दर्शविली. त्यांनी अक्षय ऊर्जा, कृषी व्यवसाय, औषधनिर्माण, आयसीटी, जैवइंधन आणि लघू उत्पादन यासारख्या प्रमुख क्षेत्रांमध्ये द्विपक्षीय व्यापार आणि गुंतवणुकीत वाढ होण्याची शक्यता देखील अधोरेखित केली.

7. पॅराग्वेच्या वतीने पॅराग्वेमध्ये भारतीय गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्याची तयारी दर्शविण्यात आली. उभय बाजूंनी देशात भारतीय व्यवसायांची उपस्थिती सुलभ करण्यासाठी कॉन्सुलर आणि प्रशासकीय प्रक्रिया सुलभ करण्यासाठी व्यावहारिक उपाययोजनांवर देखील चर्चा केली.

8. या सत्रादरम्यान, शिष्टमंडळांनी सध्या वाटाघाटी सुरू असलेल्या द्विपक्षीय कार्यपद्धतीचा आढावा घेतला आणि भारताचे सांस्कृतिक मंत्रालय आणि पॅराग्वेचे राष्ट्रीय सांस्कृतिक सचिवालय (2023–2027 कालावधी) यांच्यातील सांस्कृतिक आदान-प्रदान वरील सामंजस्य करारावर स्वाक्षरीसाठी तयार आहे यावर सहमती दर्शविली.

9. पॅराग्वेच्या शिष्टमंडळाने पॅराग्वेच्या आपत्ती प्रतिरोधक पायाभूत सुविधांसाठीच्या युती (CDRI) मध्ये सदस्यत्व औपचारिक करण्याचा आणि इंटरनॅशनल बिग कॅट अलायन्स (IBCA) च्या स्थापनेसाठी फ्रेमवर्क करारात प्रवेश मिळविण्याच्या प्रक्रियेसह पुढे जाण्याचा हेतू जाहीर केला. भारताच्या वतीने या निर्णयाचे स्वागत करण्यात आले आणि ही प्रक्रिया अधिक सुलभ करण्यासाठी आपला पाठिंबा व्यक्त केला.

10. उभय बाजूंनी मान्य केले की, दहशतवाद त्याच्या सर्व स्वरुपात आणि प्रकटीकरणांमध्ये, आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षेसाठी एक गंभीर धोका आहे. या संदर्भात, त्यांनी द्विपक्षीय, प्रादेशिक, बहुपक्षीय आणि जागतिक पातळीवर समन्वित प्रयत्नांद्वारे दहशतवादाचा मुकाबला करण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेची पुष्टी केली. परस्पर फायद्यासाठी सुरक्षा आणि सायबर सुरक्षेच्या क्षेत्रात सहकार्य आणि द्विपक्षीय समन्वय यंत्रणा मजबूत करण्याची तयारी त्यांनी व्यक्त केली.

11. व्यापार आणि गुंतवणुकीच्या संधींचा विस्तार करण्यासाठी भारत आणि मर्कोसुर मधील संबंध बळकट करण्याच्या महत्त्वावर संयुक्त आयोगाने भर दिला. या संदर्भात, पॅराग्वेने भारत आणि मर्कोसुर सदस्य राष्ट्रांसोबत संयुक्तपणे काम करण्याची आपली तयारी पुन्हा व्यक्त केली, जून 2025 मध्ये राष्ट्राध्यक्ष सँटियागो पेना यांच्या भारत भेटीदरम्यान, दोन्ही सरकारांनी मर्कोसुर-भारत प्राधान्य व्यापार

कराराच्या चौकटीत व्यावसायिक संबंध अधिक दृढ करण्याची वचनबद्धता व्यक्त केली होती याची आठवण करून दिली.

12. वर्ष 2026 मध्ये साजऱ्या होणाऱ्या राजनयिक संबंधांच्या 65 व्या वर्षपूर्ती निमित्त, उभय पक्षांनी 13 सप्टेंबर 1961 रोजी औपचारिक संबंधांच्या प्रारंभाचे स्मरण करुन त्या स्मरणार्थ आयोजित करावयाच्या कार्यक्रमांसाठी समन्वय साधण्याचे आणि यशस्वीपणे पार पाडण्याचे मान्य केले.

13. संयुक्त आयोगाचे पुढील सत्र उभय पक्षांनी परस्पर सहमतीने ठरवलेल्या तारखेला नवी दिल्ली, भारत येथे होईल यावर सहमती झाली.

**आसुन्सियोन**

14 नोव्हेंबर 2025